GOVERNMENT OF KARNATAKA

NCERT

आनंददायी गणित

Joyful Mathematics

Part - 2

Class

1

NOT TO BE REPUBLISHED @KSEBS

मराठी माध्यम

MARATHI MEDIUM

विद्यया ऽमृतमश्नुते

एन सी ई आर टी
NCERT

राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान और प्रशिक्षण परिषद्
NATIONAL COUNCIL OF EDUCATIONAL RESEARCH AND TRAINING

Karnataka Textbook Society (R.)
6th Cross, Malleshwaram, Bengaluru - 560 003.

CONSTITUTION OF INDIA

Part III (Articles 12 – 35)
(Subject to certain conditions, some exceptions
and reasonable restrictions)

guarantees these

Fundamental Rights

Right to Equality

- before law and equal protection of laws;
- irrespective of religion, race, caste, sex or place of birth;
- of opportunity in public employment;
- by abolition of untouchability and titles.

Right to Freedom

- of expression, assembly, association, movement, residence and profession;
- of certain protections in respect of conviction for offences;
- of protection of life and personal liberty;
- of free and compulsory education for children between the age of six and fourteen years;
- of protection against arrest and detention in certain cases.

Right against Exploitation

- for prohibition of traffic in human beings and forced labour;
- for prohibition of employment of children in hazardous jobs.

Right to Freedom of Religion

- freedom of conscience and free profession, practice and propagation of religion;
- freedom to manage religious affairs;
- freedom as to payment of taxes for promotion of any particular religion;
- freedom as to attendance at religious instruction or religious worship in educational institutions wholly maintained by the State.

Cultural and Educational Rights

- for protection of interests of minorities to conserve their language, script and culture;
- for minorities to establish and administer educational institutions of their choice.

Right to Constitutional Remedies

- by issuance of directions or orders or writs by the Supreme Court and High Courts for enforcement of these Fundamental Rights.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

Constitution of India

Part IV A (Article 51 A)

Fundamental Duties

It shall be the duty of every citizen of India —

(a) to abide by the Constitution and respect its ideals and institutions, the National Flag and the National Anthem;

(b) to cherish and follow the noble ideals which inspired our national struggle for freedom;

(c) to uphold and protect the sovereignty, unity and integrity of India;

(d) to defend the country and render national service when called upon to do so;

(e) to promote harmony and the spirit of common brotherhood amongst all the people of India transcending religious, linguistic and regional or sectional diversities; to renounce practices derogatory to the dignity of women;

(f) to value and preserve the rich heritage of our composite culture;

(g) to protect and improve the natural environment including forests, lakes, rivers, wildlife and to have compassion for living creatures;

(h) to develop the scientific temper, humanism and the spirit of inquiry and reform;

(i) to safeguard public property and to abjure violence;

(j) to strive towards excellence in all spheres of individual and collective activity so that the nation constantly rises to higher levels of endeavour and achievement;

*(k) who is a parent or guardian, to provide opportunities for education to his child or, as the case may be, ward between the age of six and fourteen years.

Note: The Article 51A containing Fundamental Duties was inserted by the Constitution (42nd Amendment) Act, 1976 (with effect from 3 January 1977).

*(k) was inserted by the Constitution (86th Amendment) Act, 2002 (with effect from 1 April 2010).

NOT TO BE REPUBLISHED @KVRS

अनुक्रमणिका

B3U3P7

प्रकरण 7	लीनाचे कुटुंब (मापन)	1-12
प्रकरण 8	अंकांची गंमत (संख्या 21 ते 99)	13-26
प्रकरण 9	उत्सव (आकृतीबंध)	27-33
प्रकरण 10	माझी दिनचर्या ? (वेळ/काळ)	34-39
प्रकरण 11	किती वेळा ? (गुणाकार)	40-43
प्रकरण 12	आपण किती खर्च करू शकतो ? (रूपये आणि पैसे)	44-48
प्रकरण 13	खूप सारी खेळणी (माहिती हाताळणे)	49-51
प्रकरण 14	कोडी	52-57

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

7 लीनाचे कुटुंब

A6Y7A1

लीनाचा कौटुंबिक स्नेहमेळावा


लीना तिच्या कुटुंबासह गावात राहते. ती तिचे आजी-आजोबा, आई-वडील आणि भाऊ शानबोर यांच्याबरोबर राहते. तिचे काका, काकू आणि चुलत भावंडे त्यांच्या घराजवळ राहतात.



© SCERT NOT TO BE REPUBLISHED

लीना स्टूलवर उभी आहे. तिला उंच दिसायला आवडते. या कुटुंबातील सर्वात उंच सदस्य शोधा आणि त्याच्याभोवती गोल करा.

लीनाच्या कुटुंबाने त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांना एकत्र स्नेहमेळाव्यासाठी आमंत्रित केले आहे.



NOT TO BE REPUBLISHED



चला बोलूया.

अ. लीनाच्या कुटुंबात किती सदस्य आहेत ?

ब. कुटुंबातील सर्वात उंच सदस्यावर खूण करा.


क. कुटुंबातील सर्वात बुटक्या सदस्यावर टोपीचे चित्र काढा.

ड. लीनाच्या आईपेक्षा उंच पण लीनाच्या वडिलांपेक्षा बुटके कोण आहे ?

इ. तुझ्या कुटुंबातील सर्वात उंच आणि सर्वात बुटका सदस्य कोण आहे ?

फ. तुझ्या वर्गातील सर्वात उंच मूल कोण आहे ?

ग. तुझ्या वर्गातील किती मुले तुझ्यापेक्षा उंच आहेत ?



लीना एका डोंगराळ भागात एका झोपडी आकाराच्या घरात राहते. वरील चित्रात तुम्ही तिचे घर शोधू शकता का ? योग्य पर्यायांभोवती गोल करा.

अ. तिचे घर दुकानापासून **सर्वात जवळ/सर्वात लांब** आहे आणि शाळेपासून **सर्वात जवळ/ सर्वात लांब** आहे.


ब. शाळा दुकानापासून **सर्वात जवळ/सर्वात लांब** आहे आणि लाल छताच्या घरापासून **सर्वात जवळ/सर्वात लांब** आहे.

क. मूल शाळेच्या बसपासून **सर्वात जवळ/सर्वात दूर** आहे आणि शाळेपासून **सर्वात जवळ /सर्वात लांब** आहे

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अद्‌भुत माहिती

हा सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा आहे. ज्याला 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' देखील म्हणतात. हा जगातील सर्वात उंच पुतळा असून भारतातील गुजरात येथे आहे.






चला बोलूया.

क. सर्वात लांब असलेल्या चित्रावर ✓ खूण करा .

अ.




ब.



ख. सर्वात आखूड असलेल्या चित्रावर ✓ खूण करा.

अ.




ब.




@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ग. सर्वात जाड असलेल्या चित्रावर ✓ खूण करा.

अ.



ब.




घ. सर्वात बारीक असलेल्या चित्रावर ✓ खूण करा.

अ.



ब.



विचार करून सोडवा.

यापेक्षा लांब काठी किंवा बांबूचे चित्र काढा. यापेक्षा आखूड दोरीचे चित्र काढा.






आजी वितीने चैत्राच्या स्वेटरची लांबी मोजत आहे.




@KTBS NOT TO BE REPUBLISHED

चैत्राला वितीने काठी, टेबल, पेन्सिल आणि वहीची लांबीही मोजायची आहे.











विचार करून उत्तर द्या.

अ. माझ्या टेबलाची लांबी _____ वित आहे.

ब. माझ्या दप्तराची लांबी _____ वित आहे.

क. माझ्या वर्गातील फळ्याची लांबी _____ वित आहे.

ड. माझ्या गणिताच्या पुस्तकाची लांबी _____ वित आहे.

इ. माझ्या हाताची लांबी _____ वित आहे.

फ. माझ्या मित्राच्या हाताची लांबी _____ वित आहे.





? या सर्व गोष्टींची लांबी मोजण्यासाठी चैत्रा वित वापरू शकते का? तुमच्या सभोवतालच्या कोणत्या वस्तू वितीपेक्षा लहान आहेत ते शोधा आणि त्याभोवती गोल करा. या गोष्टींची लांबी मोजण्यासाठी आपण बोटांचाही वापर करू शकतो का?

@KTRS NOT TO BE REPUBLISHED



चला करून पाहू.

या वस्तूंची लांबी मोजण्यासाठी तुम्ही वित किंवा बोटे यापैकी काय निवडाल आणि का? खालील तक्त्यातील तुम्ही निवडलेल्या पर्यायांभोवती गोल करा. या वस्तूंची लांबी मोजण्यापूर्वी तिचा अंदाज लावण्याचा प्रयत्न करा.

वस्तूंची नावे	तुम्ही जे वापराल त्याभोवती गोल करा?	माझा अंदाज	माझे निष्कर्ष
बाटली 	 वित किंवा बोटे		
चमचा 	 वित किंवा बोटे		
पेन्सिल 	 वित किंवा बोटे		
माझ्या मित्राचे नाक 	 वित किंवा बोटे		
पाय 	 वित किंवा बोटे		
किल्ली 	 वित किंवा बोटे		

@KBS NOT TO BE REPUBLISHED

पावलांनी मोजा	माझा पावलांचा अंदाज	पावलाबद्दल माझे निष्कर्ष
माझ्या जागेपासून वर्गाच्या दारापर्यंतचे अंतर		
तुमच्या खोलीच्या दोन भिंतींमधील अंतर		
घरातील स्वच्छतागृह आणि पलंगमधील अंतर		
वर्ग खोलीची एक भिंत आणि पायरी		






चला करून पाहू.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अ. जड वस्तूवर ✓ खूण करा.

क.





ख.





ब. हलक्या वस्तूवर ✓ खूण करा.

क.





ख.








क. जड वस्तू रंगवा.

अ.




ब.



स.




द.



ड. हलकी वस्तू रंगवा.


अ.




ब.



स.



द.



@KTBS
NOT TO BE REPUBLISHED



चला बोलूया.

अ. तुम्ही आणि तुमचा मित्र यामध्ये कोण जास्त जड आहे ? तुम्हाला कसे माहित होईल ? वर्गात चर्चा करा.

ब. तुमचे वजन माहित करून घ्या. तुमचे वजन नेहमी कसे आणि कुठे मोजले जाते ते तुम्ही सांगू शकाल का ?



चला करून पाहू.

अ. बादलीत पाणी भरा.



अ. _____ तांब्या/ जग पाण्याने बादली भरेल.

ब. _____ पेले पाण्याने बादली भरेल.

स. _____ वाट्या पाण्याने बादली भरेल.

ब. खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

अ. किती कप पाण्याने तुमची पाण्याची बाटली भरेल ? _____


ब. आता त्याच कपाने तुमच्या मित्राची पाण्याची बाटली भरा तुमच्या मित्राची बाटली किती कप पाण्याने भरले ? _____

स. कोणत्या बाटलीत जास्त पाणी आहे ? _____

द. दुसरी बाटली वापरून पहा. कोणत्या बाटलीत कमी पाणी मावते ?

क. ज्यामध्ये जास्त पाणी मावेल त्याभोवती ◯ गोल करा.


@KTBS NOT TO BE REPUBLISHED














ड. पाणी आपल्यासाठी खूप उपयुक्त आहे.

दिलेल्या कृतींसाठी तुम्हाला आवश्यक असलेल्या पाण्याच्या प्रमाणावर ✓ खूण करा.

क.



दात घासण्यासाठी



पाण्याने भरलेली एक बादली



पाण्याने भरलेला एक मग


ख.



आंघोळीसाठी




पाण्याने भरलेली एक बादली



एक टाकी

ग.



दोन ग्लास लिंबू पाणी करण्यासाठी



एक जग भरून



पाण्याने भरलेली एक बादली


घ.



रोपाला पाणी देण्यासाठी



पाण्याने भरलेला मग



पाण्याने भरलेली एक बादली

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



योजना कार्य

अ. शॉवर किंवा वाहत्या नळाच्या पाण्याऐवजी आंघोळीसाठी बादलीत पाणी घेणे महत्त्वाचे का आहे. यावर चर्चा करा?

ब. रंगीबेरंगी कागदाच्या पट्ट्या फाडा आणि पट्टीचा एक भाग आखूड आणि दुसरा लांब होईल असे चिकटवा. पट्ट्या वेगवेगळ्या आकारांच्या असाव्यात.

आखूड ह्या आखूड आहेत	**लांब** ह्या लांब आहेत

क. वाहून न्यायला सोप्या आणि वाहून न्यायला कठीण अशा गोष्टींची यादी करा.

वाहून नेणे सोपे	**वाहून नेणे कठीण**

ड. वेगवेगळ्या आकारांच्या बाटल्या, वाट्या आणि पेले घ्या. आता बाटली पाण्याने भरण्यासाठी किती पेले किंवा वाट्या लागतात ते बघा. यांपैकी कशात जास्त पाणी मावू शकते?

मुले एका दिवसात किती पेले पाणी पितात हे त्यांना विचारा.
आसपास पाणी वाया जात असल्याबद्दल त्यांच्याशी चर्चा करून त्यांना त्याबाबत संवेदनशील बनवा. पेल्यामध्ये पाणी शिल्लक राहिले तरी काय करतील? आपण ते पाणी फेकावे की झाडांना घालावे.वापरात नसताना नळ बंद करणे. पाण्याचा पुनर्वापर करणे इ. पाण्याची बचत करण्याच्या इतर मार्गावर देखील चर्चा करा.




@KTBS NOT TO BE REPUBLISHED


8 गंमत अंकासोबत

B1R1B1

सिमरन खोक्यांमध्ये संत्री ठेवत होती. प्रत्येक खोक्यात 10 संत्री मावतात. तिला किती खोकी लागतील?





तिने ती संत्री खोक्यांमध्ये ठेवली.




@KTBS NOT TO BE REPUBLISHED


एकूण किती संत्री आहेत माहित आहे का?















21
एकवीस







22
बावीस


		तेवीस
		24 चोवीस
		पंचवीस
		सव्वीस
		27 सत्तावीस


@KTBS
NOT TO BE REPUBLISHED







28
अठ्ठावीस





एकोणतीस





30
तीस

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

21 ते 30 लिहा

21				25					
		23							30
	22					27			















फुले आणि कडूनिंबाची दात घासणी यांची मोजणी करूया.



31 ते 50 अंक

	31 एकतीस		36 छत्तीस
	32 बत्तीस		 सदतीस
	 तेहेतीस		 अडतीस
	 चौतीस		39 एकोणचाळीस
	35 पस्तीस		40 चाळीस

©KEDP NOT TO BE REPUBLISHED

	41 एकेचाळीस		46 शेहेचाळीस
	 बेचाळीस		 सत्तेचाळीस
	43 त्रेचाळीस		 अठ्ठेचाळीस
	 चव्वेचाळीस		49 एकोणपन्नास
	45 पंचेचाळीस		50 पन्नास


@KTBS NOT TO BE REPUBLISHED




चला करून पाहू.

अ. 1 ते 50 मधील कोणताही अंक पत्ता घ्या. चिमट्याच्या मदतीने अंक पत्ता अंकमाळेत योग्य ठिकाणी लावता येईल का ?


ब. अंकमाळेत लावलेल्या अंक पत्त्यांवरील अंक लिहा.



मोजणी करून संख्या लिहा.




संख्या दर्शविण्यासाठी दशक चौकटी भरा. तुमच्यासाठी एक करून दाखविले आहे.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

दशक आणि 21 ते 50 अंकांबद्दल बोलण्यासाठी मोजमणी माळ वापरा. तसेच मुलांना सुरूवातीला मोजमणी माळा किंवा अंकमाळ वापरून दिलेल्या कोणत्याही संख्येपासून उलट मोजणी करण्यासाठी प्रोत्साहित करा. एकदा आत्मविश्वास आल्यावर ती मोजमणी माळेशिवाय ही कृती करू शकतात.

गाळलेल्या संख्या भरा.




© MSCERT NOT TO BE REPUBLISHED



प्रकल्प कार्य


फरहा म्हणाली की तिने तिच्या काड्यापेटीत पन्नासहून अधिक विस्मयकारक गोष्टी ठेवल्या आहेत. या गोष्टी काय असू शकतील ? याबाबत तिच्या मित्र–मैत्रिणींना उत्सुकता वाटली. तिने तिची पेटी उघडली तेव्हा त्यांना खूप आश्चर्य वाटले. तुम्ही काही वस्तू गोळा करून त्यांपैकी काड्यापेटीत किती मावतात ते पाहू शकता ?





51–99 मधील संख्या

अंकिता तिच्या घरावर आरसे चिकटवित आहे. तिने या नक्षीकामात किती आरसे वापरले आहेत हे शोधण्यासाठी तिला मदत करा. ☐























51 ते 60 पर्यंत संख्या मोजा आणि लिहा.

	51 एकावन्न		☐ छप्पन्न
	52 बावन्न		☐ सत्तावन्न
	☐ त्रेपन्न		☐ अठ्ठावन्न
	☐ चोपन्न		59 एकोणसाठ
	☐ पंचावन्न		60 साठ





















NOT TO BE REPUBLISHED @KTBS

61 ते 80 पर्यंत संख्या मोजा आणि लिहा.

	61 एकसष्ट		71 एकाहत्तर
	62 बासष्ट		72 बहात्तर
	☐ त्रेसष्ट		☐ त्र्याहत्तर
	☐ चौसष्ट		74 चौऱ्याहत्तर
	☐ पासष्ट		75 पंचाहत्तर
	☐ सहासष्ट		☐ शहात्तर
	☐ सदुसष्ट		☐ सत्याहत्तर
	☐ अडुसष्ट		78 अठ्याहत्तर
	☐ एकोणसत्तर		☐ एकोणऐंशी
	70 सत्तर		80 ऐंशी

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

81 ते 100 पर्यंत संख्या मोजा आणि लिहा.

	81 एक्याऐंशी		91 एक्याण्णव
	ब्याऐंशी		ब्याण्णव
	83 त्र्याऐंशी		त्र्याण्णव
	चौऱ्याऐंशी		चौऱ्याण्णव
	पंच्याऐंशी		95 पंच्याण्णव
	86 शहाऐंशी		शहाण्णव
	सत्याऐंशी		97 सत्याण्णव
	अठ्याऐंशी		अठ्याण्णव
	89 एकोणनव्वद		नव्याण्णव
	90 नव्वद		100 शंभर

© KTPS NOT TO BE REPUBLISHED

चला करून पाहू.


मोजमणी माळ दोन्ही बाजूंना दोन टोकांनी बांधा. कोणताही अंकपत्ता (1 ते 99) निवडा. मोजमणी माळेवर योग्य ठिकाणी चिमट्याने अंक पत्ते लावा. इतर पत्ते वापरून देखील तुमच्या मित्रांशी खेळा.





@KTBS NOT TO BE REPUBLISHED

संख्यांची बेरीज करण्यासाठी मोजमणी माळा वापरा. दिलेल्या कोणत्याही दोन संख्यांमधील संख्या विचारा.

संख्या मोजा आणि लिहा.







गाळलेल्या संख्या भरून एक घसरगुंडीचा खेळ बनवा.

100		98	97	96	95			92	
81	82	83	84		86	87	88		90
80	79		77	76		74	73	72	71
61	62	63		65	66		68	69	
	59	58		56		54	53	52	51
41	42	43		45			48		50
40		38	37	36		34	33	32	31
21	22		24	25		27	28		30
20	19	18	17	16	15		13	12	11
1	2	3		5	6		8	9	

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

हा खेळ घराबाहेर खेळू शकतो (काठ्या आणि दोरी यांचा घसरगुंडीसारखा वापर करा आणि एका खडूने काही चौरस काढा.) काही कार्यपत्ते चौकोनावर ठेवता येतील. सूचनांमध्येदेखील काही बदल केले जाऊ शकतात जसे की अंकांची देवाणघेवाण झालेल्या संख्येवर जा. तुमच्या उजवीकडची एक संख्या वगळा आणि उडी मारा इ.



हे चित्र पहा.



@KTDC NOT TO BE REPUBLISHED



चला बोलूया.

अ. चित्रात काय घडते आहे ते पहा आणि चर्चा करा ?

ब. दिलेल्या चित्रात तुम्हाला कोणत्या वेगवेगळ्या गोष्टी दिसत आहेत ?

क. चित्रात किती घरे आहेत ?

ड. चित्रात किती लोक आहेत ?

इ. झाडाची पाने काढण्यासाठी किती रेषा वापरल्या जातात याचा अंदाज लावा ?

फ. या चित्रशैलीचे विशिष्ट नाव तुम्हाला माहीत आहे का ?

ग. भारतातील कोणता भाग वारली चित्रशैलीसाठी प्रसिद्ध आहे ?

आपले स्वत:चे वारली रेखाचित्र बनवा।







@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

9

उत्सव

G6K1V7




© @KTBS NOT TO BE REPUBLISHED

भारतीय दिनदर्शिकेनुसार मकरसंक्रांत, पोंगल, बिहू किंवा लोहरी यासारखे सण म्हणजे हिवाळ्यातून उन्हाळ्यात होणाऱ्या संक्रमणाची सुरूवात असते. सूर्याच्या आरामदायी उबदारपणाची चाहूल नुकतीच प्रकट होत असते आणि पिकांचे सुगीचे दिवस सुरू झालेले असतात. मुले ज्या वेगवेगळ्या स्थानिक उत्सवांची वाट पाहत असतात व आपल्या कुटुंबीयांसमवेत सण साजरा करतात. त्याबद्दलही मुलांशी चर्चा व्हायला हवी. चित्रे प्रत्येक उत्सवाचा मूळ हेतू काय. त्यांतील वेगवेगळे आकार आणि नमुने (पॅटर्न) कसे असतात. या गोष्टी अधोरेखित करतात आणि या गोष्टींची चर्चा मुलांसोबत करता येऊ शकते.




@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

रेखांकन करून नमुने पुढे न्या.


अ. 


ब. 


क. 

ड. 

इ. 

फ. 

ग. 

ज. 

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED


मुलांना नमुने तयार करण्यासाठी, ठोस वस्तू वापरण्यास प्रोत्साहित करा.






चला करूया.

मुन्नाला  रंगांची खूप आवड आहे. अंगठा आणि बोटांच्या ठशांनी त्याने एक नमुना तयार केला आहे. तुम्हीदेखील दिलेल्या जागेत तुमचा अंगठा आणि बोटांच्या ठशांनी असा नमुना तयार करू शकता.













@KTBS NOT TO BE REPUBLISHED




गुलाबी नंतर कोणता रंग येईल आणि का? चर्चा करा.


मुलांना वेगवेगळ्या भाज्या गोळा करायला सांगा आणि मोठ्यांच्या मदतीने त्या कापून त्याचे तुकडे करा. तुमच्या आवडीचा नमुना तयार करण्यासाठी या भाज्यांचे काप वापरा.



नमुने पहा आणि ते रंगवून पुढे न्या.





गाळलेले भाग भरून नमुना पूर्ण करा.




@KTBS NOT TO BE REPUBLISHED

नमुना अभ्यासून गाळलेल्या संख्या भरा.














© KTBS NOT TO BE REPUBLISHED

मुर्ती आणि वाणी त्यांच्या अम्माला कोलम (रांगोळी) काढण्यात मदत करत आहेत. त्यांना कोलम पूर्ण करण्यासाठी तुम्हीदेखील मदत करू शकता.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED



योजना कार्य

अ. खडे, फुले, पाने, काचा, वाट्या, काठ्या, बांगड्या, नाणी, टोप्या इत्यादी गोळा करा आणि त्यांची एका नमुन्यात रचना करा. दागिने, फुलांच्या भांड्यांची मांडणी, कलाकुसर केलेल्या शोभेच्या वस्तू इ. आपल्या आवडीचे वेगवेगळे नमुने तयार करून बघा.

ब. निसर्गामधील पाने, फुलपाखरे, मधमाश्यांचे पोळे, तसेच मांजर, कुत्रा, वाघ, झेब्रा यांसारख्या प्राण्यांची कातडी आणि पडदे, साड्या, ओढण्या, टाईल्स अशा गोष्टींचे निरीक्षण करून त्यातील आकार-आकृत्यांचे नमुने शोधा.

क. आजूबाजूला दिसणाऱ्या विविध वस्तू गोळा करा आणि त्यांपासून चित्रसंयोजन (कोलाज) करा.

ड. टाळ्या वाजवणे, चुटक्या वाजवणे, तुमच्या पायावर शिक्के मारणे इत्यादी विविध क्रिया करून नमुने तयार करा.

आपल्या सभोवतालचे जग विविध आकारांनी भरलेले आहे. मुलांना मंदिरे, मशीद, चर्च, गुरुद्वारा आणि त्यांच्या सभोवतालच्या स्मारकांमधील सुंदर नमुने शोधून भारताच्या समृद्ध परंपरेचे कौतुक करण्यास प्रोत्साहित करा. तसेच विविध कला प्रकारांमधील, नृत्य प्रकारातील हालचालींमधील इ. नमुन्यांची त्यांची निरीक्षणे इतरांना सांगण्यास सांगा.




10 माझी दिनचर्या

W2C3R2



नमस्कार मित्रांनो, मी पिहू आहे. मी 6 वर्षांची आहे. मी सकाळपासून रात्रीपर्यंत काय काय करते ही माझी दिनचर्या आज मी सांगणार आहे.

पहा, आकाशात सूर्य उगवत आहे. सकाळ झाली आहे.





मी सकाळी बिछान्यातून उठते आणि पेलाभर कोमट पाणी पिते.

माझा दिवस योग किंवा व्यायामाने सुरू होतो.





मग मी दात घासते आणि आंघोळ करते.

मी न्याहारी करून शाळेला जाण्यासाठी तयार होते.





© KTBS NOT TO BE REPUBLISHED


मी शाळेत माझ्या वर्गमित्रांसह अभ्यास करते आणि खेळते.






सूर्य आकाशात वरती चढला आहे. ही दुपारची वेळ आहे. मी माझे हात धुते आणि माझ्या मित्र–मैत्रिणींबरोबर जेवते.

मी शाळेतून घरी परत येते आणि थोडा वेळ विश्रांती घेते.








पहा, सूर्य मावळत आहे. आता संध्याकाळची वेळ आहे. मी माझ्या मित्र–मैत्रिणींबरोबर खेळते आणि मग अभ्यास करते.

ते पहा, आकाशात चंद्र आणि तारे दिसत आहेत. ही रात्रीची वेळ आहे.





मी माझ्या कुटुंबासोबत रात्रीचे जेवण करते. दात घासून चूळ भरते.

मी गोष्टींचे एक पुस्तक वाचते आणि मग झोपी जाते.



@KTRS NOT TO BE REPUBLISHED



चला बोलूया.

अ. तुमचा दिनक्रम काय आहे ?

ब. तुम्ही दात कधी घासता ?

क. तुम्ही आंघोळ कधी करता ?



चला करू या.

तुम्ही सकाळी करत असलेल्या कृतींवर बरोबरची खूण ✓ करा.






@KTBS NOT TO BE REPUBLISHED

तुम्ही दिवसभरात करत असलेल्या किंवा पाहत असलेल्या कृतींवर बरोबरची खूण ✓ करा.







तुम्ही रात्री करत असलेल्या कृतींवर बरोबरची खूण ✓ करा.








चित्र पाहून दिवसाच्या वेळेचा अंदाज लावा.

त्या काळात तुमचे मित्र काय करतात याबद्दल त्यांच्याशी चर्चा करा?









@KTBS NOT TO BE REPUBLISHED



चला करू या.


सामान्यतः जास्त वेळ घेणाऱ्या कृती रंगवा.

अ.





ब.







ऋतू



उन्हाळा



बसंत ऋतू



पावसाळा




हिंवाळा

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

वरील चित्रे पहा आणि उन्हाळा, हिंवाळा, वसंत ऋतु आणि पावसाळा या ऋतूंमधील फरकांबद्दल चर्चा करा.

वस्तू ऋतूच्या नावाशी जुळवा.

पावसाळा



वसंत ऋतू

उन्हाळा

हिंवाळा



चला बोलूया.

अ. उन्हाळ्यात तुम्हाला काय खायला आवडते ?

ब. हिंवाळ्यात तुम्ही कोणत्या प्रकारचे कपडे वापरता ?



चला करूया.

ऋतूंची नावे लिहा आणि ती चित्रांशी जुळवा.



















@KTBS NOT TO BE REPUBLISHED



योजना कार्य

मुलांना विविध ऋतूंमध्ये खाल्ल्या जाणाऱ्या त्यांच्या आवडत्या खाद्यपदार्थांची आणि या ऋतूंमध्ये साजऱ्या होणाऱ्या स्थानिक सणांची चित्रे काढायला किंवा चिकटवायला सांगा.

11 किती वेळा?

M3B5X9

मनोरंजन बागेची सहल

मुलांच्या एका समूहाने मनोरंजन बागेला भेट दिली.



वा. आपल्यापैकी दोघे-दोघे घोडयावर बसू शकतो। मी माझ्या मित्राबरोबर बसते.



सर्व मिळून एकूण मुले

2 + 2 + 2 + 2 = ☐

आपल्यापैकी ☐ जण एका घोडयावर बसू शकतो.


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

खेळाच्या ट्रेनमध्ये आपल्यापैकी तीन मुले बसू शकतात. आपण सर्व एकत्रच बसू.



येथे तीन डबे आहेत. प्रत्येक डब्यात 3 मुले बसतात. 3 + 3 + 3 = ☐


एकूण ☐ मुले तीन डब्यात बसू शकतात.



☐ + ☐ + ☐ + ☐ + ☐ = ☐

एकूण ☐ मुले झुल्यावर बसू शकतात.

झुल्यावर खेळून झाल्यानंतर मुलांनी जिलेबी खाण्याविषयी विचार केला. प्रत्येक प्लेटमध्ये तीन जिलेब्या आहेत. त्यांनी सहा प्लेट जिलेब्या खरेदी केल्या आहेत.



☐ + ☐ + ☐ + ☐ + ☐ + ☐ = ☐

6 वेळा 3 म्हणजे = ☐

पुढील चित्रात किती मुले आहेत, प्रत्येक कक्षात किती मुले बसली आहेत आणि प्रवासाला निघालेल्या मुलांची एकूण संख्या किती आहे. अशासारख्या प्रश्नांच्या माध्यमातून प्रत्येक कृतीत किती गट असावेत याची चर्चा होणे आवश्यक आहे ?

© KTBS NOT TO BE REPUBLISHED




बसमध्ये किती लोक आहेत?

2 + 2 + 2 + 2 + 2 + 2 + 2 + 2 + 2 = ☐

9 वेळा 2 = ☐

बसमधील एकूण माणसे = ☐

बसमध्ये पाण्याच्या बाटल्यांचे काही खोके ठेवले आहेत. त्यांना मोजा.



☐ + ☐ + ☐ + ☐ = ☐


4 वेळा 5 = ☐

बसमधील एकूण बाटल्यांची संख्या = ☐

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

चिनू ने दुकानातून काही खोडरबरांची पाकिटे, पेन्सिली आणि सफरचंदे खरेदी केली. त्या प्रत्येकाची एकूण संख्या काढा.

अ.




2 + ☐ + ☐ + ☐ = ☐ खोडरबर

4 वेळा 2 = ☐

खोडरबरांची एकूण संख्या = ☐

ख.



3 + ☐ + ☐ + ☐ + ☐ = ☐ लेखण्या/पेन्सिली

5 वेळा 3 = ☐

पेन्सिलींची एकूण संख्या = ☐

ग.



3 + ☐ + ☐ = ☐ सफरचंदे

3 वेळा 3 = ☐

सफरचंदांची एकूण संख्या = ☐



योजना कार्य

एक सायकलच्या चाकाचे चित्र काढा. तुमच्या मित्रांना विचारा, त्यांच्या घरात किती सायकली आहेत आणि आपल्या घरातील सायकलींची संख्या सांगा आणि या सर्व सायकलीच्या एकूण चाकांची संख्या किती होते ते शोधा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

12 आपण किती खर्च करू शकतो?

S8E2J3



रिया ₹1, ₹2, ₹5, ₹10 अशी नाणी मोजत आहे आणि साहिल ₹10, ₹20, ₹30, ₹50, ₹100 रूपयांच्या नोटा मोजत आहे. या नाण्यांकडे आणि नोटांकडे पहा आणि त्यांची दर्शनी रक्कम खाली लिहा.

			
₹1			
			
₹10			

NOT TO BE REPUBLISHED @KEYS PUBLISHING



चला करूया.

अ. एका चेंडू  ची किंमत 20 रूपये आहे.

रियाने चेंडूसाठी 5 रुपयांची _____ नाणी दिली.

साहीलने चेंडूसाठी 10 रुपयांच्या _____ नोटा दिल्या.

ब. अशा खेळण्यांची नांवे लिहा जी 10 रुपयांमध्ये घेता येतील.

क. अशा खेळण्यांची नांवे लिहा जी 20 रुपयांमध्ये घेता येतील.

ड. जर एका गाडीची किंमत रू. 14/– आहे आणि रियाकडे फक्त रू. 10/– आहेत तर ती गाडी घेण्यासाठी तिला आणखी किती रुपयांची गरज आहे?

इ. रिया आणि साहिल या दोघांकडे मिळून रू. 30/– आहेत. तर ते दोघे कोणकोणती खेळणी घेऊ शकतील?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

एकूण रक्कम किती होते ते पाहून योग्य पर्याय समोर ✓ चिन्ह लिहा.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED



चला खेळूया.

कागदाचा वापर करून तुम्ही तुमच्या नोटा आणि नाणी तयार करा. आपल्या वर्गामध्ये दुकान–दुकान असा खेळ खेळा.

काही विद्यार्थी दुकानदार आणि उरलेले सर्व गिऱ्हाईक असतील. कागदापासून बनविलेल्या नोटा, नाणी वापरून गिऱ्हाईकांना वस्तू खरेदी करायला सांगा. पैशांचा विविध प्रकारे वापर करून खरेदीसाठी प्रोत्साहित करा.



खाली दिलेल्या विविध किंमतीच्या नोटांचा आणि नाण्यांचा वापर करून दाखविलेल्या किंमतीच्या नोटा किंवा नाणी एकत्र करा.





₹20

₹10

₹13

₹8

© NCERT NOT TO BE REPUBLISHED

रेषा काढून समान किंमतीच्या जोड्या जुळवा.




@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पैशाची बचत करणे ही अतिशय चांगली सवय आहे. चर्चा करा.



प्रकल्प कार्य

घरातील भावंडे, आई-वडील यांच्या मदतीने तुमची स्वतःची बचत पेटी तयार करा.



विविध प्रकारे नोटा आणि नाणी वापरून एखाद्या रक्कमे एवढे समूह बनविण्यासाठी मुलांना प्रोत्साहित करा.



13 खेळणीच खेळणी

V7J9Q2

चित्राचे निरीक्षण करून कोणकोणत्या प्रकारची आणि एकूण किती खेळणी आहेत ते ओळखा.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

हत्ती ☐ अस्वले (टेडी बिअर्स)  ☐

गाड्या  ☐ बाहुल्या  ☐

खालील वाक्य अधिक/कमी/बरोबर हे शब्द वापरून भरा.

अ. बाहुल्यांची  संख्या गाड्यांच्या  संख्येपेक्षा _____ आहे.

ब. हत्तींची  संख्या आणि बाहुल्यांची  संख्या _____ आहे.

ग. अस्वलांची  संख्या हत्तींच्या  संख्येपेक्षा _____ आहे.

ड. गाड्यांची  संख्या अस्वलांच्या  संख्येपेक्षा _____ आहे.

रंगीबेरंगी फुले

बागेत बहुतांशी कोणत्या रंगाची फुले सर्वात जास्त दिसतात?

रंगीबेरंगी फुलांची चित्रे पाहून एकूण फुलांची संख्या लिहा.

निळी फुले  ☐ लाल फुले  ☐

नारंगी फुले  ☐ जांभळी फुले  ☐

अ. कोणत्या रंगाची फुले सर्वात कमी आहेत?

_____

क. सर्वात जास्त कोणत्या रंगाची फुले आहेत?

_____

चूक की बरोबर

अ. लाल  रंगाची फुले निळ्या रंगाच्या  फुलांपेक्षा जास्त आहेत.

ब. केशरी  रंगाची फुले जांभळ्या  फुलांपेक्षा कमी आहेत.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



प्रकल्प कार्य


अ. रंगीबेरंगी फुलांची नक्षी असलेले कार्ड बनवा.

ब. तुमच्या वर्गातील किती मुलांच्या नावांमध्ये 3 अक्षरे आहेत, किती मुलांच्या नांवामध्ये 4 अक्षरे आहेत, तसेच किती मुलांच्या नावांमध्ये 4 पेक्षा जास्त अक्षरे आहेत ते शोधा.

14 कोडी

T2E8F5


अ. कोमलने संख्यांचे पत्ते लावले आणि अनयाने त्यांना भांड्याखाली अशाप्रकारे लपविले. तुम्ही या संख्यांना ओळखू शकता का?




तुम्हीसुद्धा संख्यांचे पत्ते तुमच्या हातांचा उपयोग करून लपवू शकता आणि हा खेळ तुमच्या मित्रांसोबत खेळू शकता.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ब. मोजा आणि सांगा की या आकृतीत किती लाकडे आहेत? 3 लाकडे की 4 लाकडे?




क. जरीनाने या काचेच्या भांड्यांची अशी रचना केली आहे. या रचना वाढविण्यासाठी तिला मदत करा.



_____ _____


ड. या आकृतीतील एक ते दहा संख्या शोधा.

द	स	सा	ठ	ती	ह	र
चा	ए	आ	ज	श	भ	पा
न	त	क	द	चा	ती	न
ओ	ऊ	अ	छ	हा	र	ज
म	पा	च	दो	ऊ	स	आ
सा	त	आ	न	क	हा	ठ



©KTBS NOT TO BE REPUBLISHED

इ. आकृतीत 1 ते 5 संख्या अशाप्रकारे भरा की दोन्ही बाजूंची बेरीज समान येईल.




फ. गिल्लूचा आवडता नंबर 8 हा आहे. त्याला विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर 8 असेल तर तो आनंदी होतो. अन्यथा तो दुःखी होतो.

आता गिल्लूला असे प्रश्न विचारा की त्या प्रश्नाचे उत्तर 8 असेल.

ग. △, □ आणि ○ या आकृतीत अशाप्रकारे भरा की प्रत्येक आकृती आडव्या आणि उभ्या चौकोनात एकदाच येईल.







ह. 4 प्रकारच्या प्रत्येकी 4 वस्तू घ्या जसे की 4 बटणे, 4 गोट्या, 4 चेंडू, 4 बिया इत्यादी. आता या वस्तू दिलेल्या आकृतीमधील चौकोनामध्ये अशाप्रकारे ठेवा की प्रत्येक आडव्या रेषेत आणि प्रत्येक उभ्या रेषेत प्रत्येक वस्तू फक्त एकदाच येईल.







@KTBS NOT TO BE REPUBLISHED

आणखी वेगळ्या प्रकारे तुम्हाला अशी रचना करता येऊ शकेल का?

च. मी कोण आहे ? (आरसा मदत करू शकेल) ?








छ. मी कोण आहे ?

1. मी 5 आणि 10 यामधील संख्या आहे माझी आरशातील प्रतिमा आणि मी यात 3 चा फरक आहे .
2. मी 8 पेक्षा 3 ने मोठा आणि 14 पेक्षा तीन ने लहान आहे.
3. मी 50 पेक्षा मोठा परंतु 54 पेक्षा लहान आहे. माझ्या अंकांची बेरीज 7 आहे.
4. मी 40 पेक्षा 1 ने लहान आहे.
5. माझ्यात 5 मिळवा आणि तुम्हाला 24 मिळेल.
6. मी 35 पुढील लगतची संख्या आहे.
7. माझ्यातून आठ वजा केल्यास 14 उरतील.

क. 6 आगकाड्या वापरून शून्य ही संख्या तयार केली आहे. त्यातील एकाच काडीला उचलून आणि दुसऱ्या ठिकाणी ठेवून दुसरी कोणती संख्या तयार करता येईल ?



गायब तुकड्यांना शोधा आणि भांड्यांची आकृती पूर्ण करा.





@KTBS NOT TO BE REPUBLISHED

25 मधून 5 ही संख्या किती वेळा वजा करता येईल ?

घ. राणूकडे 3 बिया आहेत. खाली दिलेल्या संख्या तक्त्यात कोणत्याही 3 संख्यांवर या 3 बिया तिला अशा ठेवायच्या आहेत, तेथील संख्यांची बेरीज 17 यायला हवी आपण राणूची मदत करू शकाल का ?

4	9	6	7
16	0	8	5
15	13	1	2
17	10	3	12

किती प्रकारांनी तुम्हाला हे करता आले ?

जर तुमच्याकडे 2 च बिया असतील तर 17 बेरीज येण्यासाठी त्या कुठे ठेवाल ?

ण. योग्य छायाचित्राला वलयांकित (गोल) करा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED





अ.



ब.




क.



ड.


त. खालील आकृतीतील चौकोनांमध्ये 5 ते 9 संख्या अशा प्रकारे लिहा की त्यांची उभी व आडवी बेरीज समान येईल.









थ. बेरीज अथवा वजाबाकी करून मध्यवर्ती संख्या उत्तर येईल हे पहा.








द. रिकाम्या वर्तुळात ◯ योग्य ती संख्या लिहा.





@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ध. सरिताजवळ वेगवेगळी किंमत असलेली नाणी आहेत.











कमीतकमी किती नाण्यांचा वापर करून तिला फक्त 49 रुपये खर्च करता येतील ?

न. संत्र्याची  किंमत काय असेल ते ओळखा.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प. चला, आपण चेंडूचा खेळ खेळूया .



अ. असे तीन चेंडू निवडा की त्यावरील संख्यांची बेरीज 14/16 येईल.

ब. असे तीन चेंडू निवडा, ज्यांची बेरीज सर्वाधिक असेल.

स. असे तीन चेंडू निवडा ज्यांची बेरीज सर्वात कमी असेल.

Sexual Abuse of Children and Punishments under the Protection of Children from Sexual Offences Act, 2012

As per Section 2(d) of the POCSO Act, 2012,
A "Child" means any person below the age of 18 years.

Sexual Offence	Punishment
Penetrative Assault – Any person who commits penetrative sexual assault on a child. (Section 3)	Rigorous imprisonment not less than 10 years, which may extent to life imprisonment, and fine. (Section 4)
Aggravated Penetrative Sexual Assault – Penetrative sexual assault committed under aggravated circumstances. (Section 5)	Rigorous imprisonment not less than 20 years, which may extend to life imprisonment or death, and fine. (Section 6)
Sexual Assault – Touching the private parts of a child or making the child touch any person for sexual intent. (Section 7)	Imprisonment not less than 3 years, which many extents to 5 years, and fine. (Section 8)
Aggravated Sexual Assault – Sexual assault committed under aggravated circumstances. (Section 9)	Imprisonment not less than 5 years, which may extend to 7 years, and fine. (Section 10)
Sexual Harassment of a Child (Section 11)	Imprisonment which may extend to 3 years, and fine. (Section 12)
Use of a Child for Pornographic Purposes (Section 13)	Imprisonment up to 5 years and fine; higher punishment for subsequent offences. (Section 14)
Storage or Possession of Pornographic Material Involving a Child (Section 15)	Imprisonment and fine as prescribed, which may extend to 3 years.
Abetment of an Offence under POCSO (Section 16)	Punishment prescribed for the offence abetted. (Section 17)

NOT TO BE REPUBLISHED

Necessary Steps to Be Taken in Case of Sexual Abuse of a Child

- Any person having knowledge of a sexual offence must report the matter immediately to the Special Juvenile Police Unit (SJPU) or the Local Police Station. (Section 19)
- The Child shall be produced before the Child Welfare Committee (CWC) or the Special Court within 24 hours for care and protection.
- The child shall be provided medical examination and treatment immediately, free of cost., at the nearest hospital.
- In case of a girl child, medical examination shall be conducted by a female doctor, as far as possible, in the presence of parents or a trusted person. (Section 27)
- The identity of the child shall not be disclosed through any media, including name, address, photograph, or any identifying details. (Section 23)
- As per Rule 7 of the Protection of Children from Sexual Offences Rules, 2020, where an interim compensation to meet the immediate needs of the child.
- As per Section 44 of the Protection of Children from Sexual Offences Act, 2012, the Karnataka State commission for Protection of Child Rights (KSCPCR) shall monitor the effective implementation of the provisions of the Act.


Our Commitment
Towards a Violence-Free and Child-Sate Society

Children be cautious !!! Be alert

Your body belongs only to you, You have all the rights to keep safe and protect it always.
Safe and Unsafe touches on your body

See the picture and understand

this cautious is for Boys and Girls



NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

Unsafe Touch (BAD TOUCH) - **parts of your body where nobody should touch (except parents and in their presence only doctors can touch)**

Safe touch (GOOD TOUCH) **-can touch only when required**

When you feel Unsafe Touch or any other mischief, please Say loudly NO.. Don't.. Stop it..and Scream, push the person aside and move to a safer place, be brave and inform about it, to your parents & Trusted adult and register a complaint

Published by :Distict Administration -08532-229011, Zilla Panchyat-228448
Department of Police -235635/ 235001 / 235100 / 100 /1091 District Child Protection Unit-280670,
Department of Women and Child Develpoment-225292, Unicef Child Protection Project -230610. Raichur

Be Smart, Be Safe, Be Happy

Picture courtesy : Prajavani, Bhoomika 26-07-2014

unicef

NOTE

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED